पोलीस आयुक्तालय, पिंपरीचिंचवड
पोलीस उपआयुक्त(गुन्हे)
ई मेल– dcphq.pcpc-mh@gov.in

---

प्रेस नोट दि.१८.१.२०२३

## पिंपरी चिंचवड गुन्हे शाखा, युनिट-३ ची कामगिरी
## तळेगाव दाभाडे येथील भरदिवसा पडलेल्या दरोडयातील आरोपी गजाआड
## पिंपरी चिंचवड आयुक्तालय हददीतील १२ चैन स्नॅचिंगचे गुन्हे उघड

तळेगांव दाभाडे पोलीस ठाणे हददीत दिनांक 10/1/2023 रोजी दुपारी 1.45 वा. सुमारास 5 अनोळखी इसमांनी भरदिवसा दरोडा टाकुन 24 तोळे सोने व रोख रक्कम इतर मौल्यवान ऐवज चोरी करुन पळुन गेले होते. सदर बाबत तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे गु.र.नं. 17/2023 भा.दं.वि.कलम 395, 452,323,506 (2), महाराष्ट्र पोलीस अधिनियम 37 (1)(3) सह 135, शस्त्र अधिनियम 3,25, 4,25 प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदरचा गुन्हा गंभीर स्वरुपाचा असल्याने मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांनी गुन्हे शाखेच्या सर्व पोलीस पथकांना व पिंपरी चिंचवड हददीतील सर्व पोलीस ठाण्यांना सदरचा गुन्हा उघडकीस आणणेबाबत योग्य त्या सुचना व मार्गदर्शन करुन सदरचा गुन्हा लवकरात लवकर उघडकीस आणुन आरोपीना अटक करणे बाबत आदेश देण्यात आले होते.

सदर गुन्हयाचा तपास मा.वरीष्ठांनी गुन्हे शाखा युनिट 3 कडे वर्ग केला. गुन्हे शाखा युनिट 3 कडील पोहवा/479 विठठल सानप व पोशि/2877 रामदास मेरगळ यांना गुन्हयामध्ये सहभाग असणारे आरोपींबाबत खात्रीशीर माहीती मिळाल्याने सदर गुन्हयातील आरोपींचा शोधु घेवुन सापळा रचुन सदर गुन्हयातील आरोपी 1) अमर हरिदास दहातोंडे वय 20 वर्षे, रा.वडाळा ता.नेवासा जि.अहमदनगर सध्या रा.चिबळीफाटा, बर्गेवस्ती, यशवंत जाधव यांचे खोलीत ता.खेड जि.पुणे 2) अनिल गोरखनाथ मस्के वय 30 वर्षे, रा.चिबळी फाटा, बर्गेवस्ती यशवंत जाधव यांचे खोलीत भाडयाने, मुळ रा. समतानगर, (बारवाई) ता.पनवेल जि.रायगड 3) राजु रविशंकर यादव वय 42 वर्षे, रा.तळेगांव दाभाडे, गणपती चौक, ता.मावळ जि.पुणे मुळ रा. उत्तप्रदेश 4) सोपान अर्जुन ढवळे वय 24 वर्षे सध्या रा.तळेगांव दाभाडे, गणपती चौक, ता.मावळ जि.पुणे. मुळ रा.शहारा ता.लोणार जि.बुलढाणा 5) प्रशांत राजु काकडे वय 30 वर्षे, रा.तळेगांव दाभाडे, गणपती चौक, ता.मावळ जि.पुणे यांना गुन्हे शाखा युनिट 3 ने अटक केले आहे.

सदर गुन्हयातील आरोपी राजु रविशंकर यादव हा अलिबाग पोलीस ठाणे गु.र.नं.18/2012 भा.दं.वि.कलम 395, 34,120 ब, या गुन्हयात 8 वर्षे जेल मध्ये राहुन मोका गुन्हयातुन जामिनावर सन 2020 मध्ये सुटला आहे. तसेच अनिल मस्के हा पनवेल पोलीस ठाणे गु.र.नं. 64/2014 भा.दं.वि.कलम 302, 34 मधुन जामिनावर आहे.

यातील आरोपी नामे राजु यादव व सोपान ढवळे यांना हॉटेल व्यवसाय करायचा असल्याने ते पैश्याची जमवामवी करीत असताना तळेगांव परीसरात फिरत असताना त्यांना समजले की, फिर्यादी हे पुर्वी गुटख्याचे व्यापारी होते ते पुर्वी जेल मध्ये असल्याने त्यांचे घरी भरपुर काळा पैसा दडवुन ठेवलेला आहे असे समजले नंतर राजु यादव व त्याचे साथीदार अनिल मस्के, अमर दहातोंडे,प्रशांत काकडे, सोपान ढवळे यांनी संगनमत कट करुन हत्यारांची जमवाजमवी करुन सदरचा दरोडा त्यांनी टाकलेचे त्यांनी कबुल केले आहे.

तसेच इतर दोन आरोपी नामे अनिल मस्के व अमर दहातोंडे यांचेकडे अधिक तपास केला असता त्यांनी पिंपरी चिंचवड आयुक्तालय हददीतील चाकण,आळंदी, दिघी, भोसरी, भोसरी एमआयडीसी, चिखली, तळेगाव दाभाडे परीसरातील एकुण 12 चैन स्नॅचिंगचे गुन्हे केले असल्याचे सांगुन सदर आरोपीकडून सदर चैनस्नॅचिंग गुन्हयातील एकुण 190 ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिणे हस्तगत केले आहेत.

यावप्रमाणे गुन्हे शाखा युनिट 3 ने एकुण 5 आरोपी अटक करुन एक दरोडयाचा गुन्हा, 12 चैन स्नॅचिंगचे गुन्हे, तसेच गुन्हयात वापरलेल्या दोन मोटर सायकल जप्त करुन, एक मोटर सायकल चोरी लोणीकंद पो.स्टे चा गुन्हा उघड, एकुण 02 पिस्तुले , 22 जिवंत काडतुसे,1,00,00/- रुपये रोख रक्म, 430 ग्रॅम सोन्याचे दागिणे हस्तगत करुन एकुण 25,27,000/- रुपयेचा मुददेमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस आयुक्त, श्री.विनयकुमार चौबे, मा.सह. पोलीस आयुक्त श्री.मनोज लोहिया मा.अपर पोलीस आयुक्त श्री.संजय शिंदे, मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्रीमती. स्वप्ना गोरे, सहा पोलीस आयुक्त (गुन्हे)डॉ. प्रशांत अमृतकर यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश गायकवाड,पोलीस उपनिरीक्षक गिरीश चामले, पोलीस अंमलदार- यदु आढारी, सचिन मोरे, ऋषीकेश भोसुरे,सागर जैनक, राजकुमार हनमंते, योगेश्वर कोळेकर,त्रिनयन बाळसराफ, राहुल सुर्यवंशी, सुधिर दांगट,महेश भालचिम,विठठल सानप,समीर काळे, निखील फापाळे,शशिकांत नांगरे, रामदास मेरगळ यांनी केली आहे.

(स्वप्ना गोरे)
पोलीस उपआयुक्त (गुन्हे)
पिंपरी चिंचवड